# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि.५/ संविधान गौरव महोत्सव/२०२५/ 545

दिनांक : 14 FEB 2025

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,खाजगी विनाअनुदानित पदवी, पदविका व
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय** :भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त " संविधान गौरव महोत्सव " अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थामध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत..

**संदर्भ** :संचालनालयाचे कालमर्यादित पत्र क्र.१/तंशिस/२०२५, दि.१०/२/२०२५

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, दिनांक २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्विकारण्यांत आल्याच्या घटनेला दिनांक २६ नोव्हेंबर,२०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम,लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करणे औचित्याचे ठरेल.या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरूच्चार करणे आणि नागरीकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी,शिक्षक,पालक,शहरी/ग्रामीण / आदिवासी भागातील सर्व सामान्य नागरीक/नागरीकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे,नागरी कर्तव्य व अधिकार याबाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्व सामान्यापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित पदवी व पदविका संस्थांमध्ये फेब्रुवारी, २०२५ संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव अंतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यांत यावे.

- " भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे.भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे
- राज्यघटनेच्या विविध बाबीं संदर्भात चर्चासत्र,कार्यशाळा,परिषदांचे आयोजन करणे
- महाविद्यालयामध्ये राज्यघटने विषयीचे अभ्यासक,विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व सामान्यांपर्यन्त राज्यघटना पोहोचवावी याकरिता जनजागृती अभियान राबविणे.

सर्व महाविद्यालयांनी या महोत्सवाअंतर्गत विद्यापीठातर्फे आयोजित केलेल्या विद्यापीठस्तरावरील व्याख्यानात महाविद्यालयातील प्राचार्य,अध्यापक,विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक यांना सहभागी होण्यांस आवाहन करावे.

तसेच आपण या संविधान गौरव महोत्सवाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येणा-या Google Form च्या लिंकवर भरून या विभागीय कार्यालयांस (मार्च २०२५ च्या पहिल्या आठवड्यात) सादर करण्यात यावा.

सोबत - Google Form

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\परिपत्रक २०२४.docx